# उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर यांचे कार्यालय

## गांवदेवी मंडई इमारत,पहिला मजला गांवदेवी मैदानाजवळ ठाणे (प)

दुरध्वनी क्र.०२२-२५४१६०६६ ईमेल dyr.tna.thanecity@gmail.com

जा.क.उपनि/शहर/बी-७/नाराठे/ E४९८ /सन २०१८
दिनांक - १२/०३/२०१८

प्रति,

श्री. सोनेश एल. देढिया (मुख्यप्रवर्तक)
(नियो) एलकांटो को-ऑप हौसींग सोसायटी लि.
सर्व्हे नं. १४५/ बी /१, व्हिलेज - कावेसर,
घोडबंदर रोड, ठाणे (प), ता.जि. ठाणे.
पिन - ४००६१५

**विषय - नोंदणी प्रस्ताव सादर करणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत**

संदर्भ - १. या कार्यालयाचे जा.कं./उपनि/शहर/बी-७/नाराठे/३८३३/सन २०१७ दि.२९/११/२०१७ रोजीचे नांव राखुन बँकेत खाते उघडण्याचे परवानगी पत्र.

२. आपले दिनांक २२/०२/२०१८ रोजीचे पत्र या कार्यालयास दिनांक ०७/०३/२०१८ रोजी प्राप्त

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येते.

२/- आपले दिनांक २२/०२/२०१८ रोजीचे पत्र या कार्यालयास दिनांक ०७/०३/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे त्यास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भ क्रं.१ नुसार (नियो) एलकांटो को-ऑप हौसींग सोसायटी लि. सर्व्हे नं. १४५/ बी /१, व्हिलेज - कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे (प), ता.जि. ठाणे. पिन - ४००६१५ या संस्थेस नांव राखुन ठेवून बँकेत खाते उघडण्यास दिनांक २९/११/२०१७ रोजी जा.कं./उपनि/शहर/बी-७/नाराठे/३८३३/सन २०१७ या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे व नियोजित संस्थेने दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा ठाणे शहर येथे खाते उघडले आहे. सोबत बँकेचे पत्र जोडले आहे. (खाते क्रं. 003300300021346)

संदर्भ क्रं.2 नुसार सुपर्ण नोंदणी प्रकरण सादर करणेसाठी मुदत वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

सदरच्या नियोजित संस्थेने बँकेत खाते उघडले आहे परंतु प्रवर्तकांच्या सहया होणेस विलंब झाल्यामुळे संपुर्ण नोंदणी प्रकरण नियोजित संस्था दिलेल्या कालावधीमध्ये सादर करु शकली नाही त्यामुळे त्यांचा नोंदणी प्रकरण सादर करण्याचा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यास अनुसरून त्यांनी संपुर्ण नोंदणी प्रकरण सादर करण्यास मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे तरी सभासदाच्या हिताचा विचार करता, आपणास 30 दिवसाची मुदतवाढ देण्यात येत आहे. या कालावधीत प्रस्ताव दाखल न केल्यास पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

उपनिबंधक
सहकारी संस्था,ठाणे शहर, ठाणे

# उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर यांचे कार्यालय

## गांवदेवी मंडई इमारत,पहिला मजला गांवदेवी मैदानाजवळ ठाणे (प)

दुरध्वनी क्रं.०२२-२५४१६०६६ ईमेल dyr.tna.thanecity@gmail.com

जा.क.उपनि/शहर/बी-७/नाराठे/3८33/सन २०१७
दिनांक -२८/११/२०१७

प्रति,
श्री. सोनेश एल. देढिया (मुख्यप्रवर्तक)
(नियो) एलकांटो को-ऑप हौसींग सोसायटी लि.
सर्व्हे नं. १४५/ बी /१, व्हिलेज - कावेसर,
घोडबंदर रोड, ठाणे (प), ता.जि. ठाणे.
पिन - ४००६१५

**विषयः- नियो. एलकांटो को-ऑप हौसींग सोसायटी लि यांचे नांव राखुन बँकेत खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबत.**

महोदय,

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक २१/११/२०१७ च्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे वेधण्यात येते की, आपल्या नियोजित संस्थेचे नांव (नियोजित) एलकांटो को-ऑप हौसींग सोसायटी लि. सर्व्हे नं. १४५/ बी /१, व्हिलेज - कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे (प), ता.जि. ठाणे. पिन - ४००६१५ असे राखुन ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या नावाने दि ठाणे जिल्हा मध्य.सहकारी बँक लि.शाखा - ठाणे शहर, या बँकेत खाते उघडण्यास परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१ नांव राखुन ठेवल्यापासून तीन महिन्याच्या आंत संस्थेने संपूर्ण नोंदणी प्रकरणे या कार्यालयात सादर करावे.
२ नांव राखुन ठेवलेले नांव तीन महिन्यापर्यंतच राहील, नोंदणी प्रकरण तीन महिन्याच्या आत न आल्यास नियोजित संस्थेचे नांव रदद समजण्यात येईल.
३ तीन महिन्यात नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य न झाल्यास संयुक्तीक कारणास्तव मुदतवाढी साठी मुदत अर्ज सादर करावा.
४ नियोजित संस्थेच्या नावाने खाते मुख्यप्रर्वतकाच्या सहीने उघडण्यात यावे.
५ नियाजित संस्थेच्या नावाने उघडलेल्या खात्यातील रक्कम त्यांनी संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरु होईपर्यंत नोंदणी अधिका-यांच्या पुर्वपरवानगी शिवाय काढण्यात येऊ नये.
६ या कार्यालयाच्या अटींची पुर्तता तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता प्रस्ताव सादर करतेवेळी करणेंत यावी.
७ नियोजित संस्थेच्या नावाने नांव राखुन ठेऊन बँकेत खाते उघडण्यास परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही, याची नोंद घ्यावी.
८ नोंदणी प्रस्ताव सादर करताना आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडण्यात यावीत.

यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावाने करावा.

उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे

प्रत
मा.व्यवस्थापक, दि.ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा - ठाणे शहर,

उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे

Scanned by CamScanner